MHPU240003852013

## <u>रे.मु.नं.९८/२०१३ मधील निशाणी क्र.१९ व २१ खालील संयुक्तीक आदेश</u>

१. प्रतिवादी क्र. २अ ते २क यांनी प्रस्तूतचे अर्ज त्यांचे विरूद्ध झालेला ''कैफियत—म्हणणे नाही/विना कैफियत चौकशी'' चा आदेश रद्द होवून कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जातील प्रतिवादी क्र. २अ ते २क यांचे कथनानुसार, प्रतिवादी क्र. २अ हया थंडी तापाने आजारी असल्याने प्रतिवादींना मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. २अ ते २क यांविरुध्द 'कैफियत नाही' चा हुकूम पारीत झालेला आहे. त्यामुळे 'कैफियत नाही' चा झालेला आदेश रदद् होवून, कैफियत दाखल करण्यास झालेला २७ दिवसांचा विलंब माफ होवून कैफियत अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. झालेला विलंब माफ केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट अर्ज नामंजुर झाल्यास प्रतिवादींवर अन्याय होणार आहे. सबब, नैसर्गिक न्यायतत्वानुसार अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

३. प्रस्तूतच्या अर्जावर वादीने त्यांचे म्हणणे देवून प्रतिवादींचा अर्ज मंजुर करण्यास कोणतीही हरकत नसल्याचे सांगितले.

४. अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण दाव्याचे अवलोकन केले असता, वादीने प्रस्तूतचा दावा हा सरसनिरस मानाने वाटप होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदरकामी प्रतिवादी क्र. २अ ते २क यांना दि.१३.११.२०१९ रोजी दाव्याची नोटीस बजावणी होवून ते वकीलांमार्फत

दि. १५.११.२०१९ रोजी दाव्याच्या कामी हजर झालेले आहेत. त्यांना दाव्याच्या कामी कैफियत दाखल करण्यास सुमारे २७ दिवसांचा विलंब झालेला दिसून येतो. प्रतिवादींनी सदरचे अर्ज दि.१२.०३.२०२० रोजी दाखल केलेले असून अर्जात नमूद केलेले कारण कागदोपत्री पुराव्याअभावी संयुक्तीक वाटत नाही. परंतु, प्रतिवादी क्र. २अ ते २क यांची कैफियत दाव्याच्या कामी सामील करून न घेतल्यास दाव्यातील गुंतागुंत निश्चितच वाढणार आहे व दावा सर्व बाजूंचा न्यायीक विचार करून निर्गत करणे अडचणीचे होणार आहे. याउलट प्रतिवादी क्र. २अ ते २क यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास दाव्यातील वादाचे निश्चित स्वरूप न्यायालयासमोर येवून दाव्यातील वाद निर्गत करण्यास मदत होणार आहे. तसेच वादींनी प्रस्तुतच्या अर्जास कोणतीही हरकत घेतल्याचे दिसून येत नाही. शिवाय प्रस्तुत दावा हा सरसनिरस मानाने वाटपाचा असल्याने प्रतिवादी नं. २अ ते २क यांना आपली बाजू मांडण्याची संधी देणेस नैसर्गिक न्यायतत्वानुसार गरजेचे असल्याने प्रतिवादींचे प्रस्तुत अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, प्रतिवादी क्र. २अ ते २क यांना आपले म्हणणे/कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत योग्य तो दंड आकारून अर्ज निर्गत करणे आवश्यक असल्याचे निर्णयाप्रत येवून खालील प्रमाणे आदेश पारीत करणेत येतो.

**—: आदेश :—**

१. प्रतिवादी क्र. २अ ते २क यांचे अर्ज नि. १९ व २१ मंजूर करण्यात येतात.

२. प्रतिवादी नं. २अ ते २क यांचे विरूद्ध झालेला ''कैफियत—म्हणणे नाही/विना कैफियत चौकशी'' असा आदेश रक्कम रू. ३००/— चा दंड वादीला देण्याच्या अटीवर रद्द करणेत येतो. प्रतिवादी नं. २अ ते २क यांनी दिलेली कैफियत, आदेशित दंडाची रक्कम जमा केल्यानंतर दाव्याच्या कामी दाखल करण्यात यावी.

(एम. एस. माळी)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
घोडेगाव

दिनांक — २२.०९.२०२२
घोडेगाव